# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{महसूल विभाग}**

नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील आकाशचिन्हे उभारणे व जाहिरात प्रदर्शित करणेबाबत नियमन व नियंत्रण ठेवणे तसेच अवैध आकाशचिन्ह, अवैध जाहिरात फलक इ. करीता नियमीत कार्यवाही करणे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ व नागपूर खंडपीठ व्दारा न्यायालयीन प्रकरण क्र. १५५/२०११ व क्र. २६६/२०१० व २५६/२०१० पारीत केलेल्या आदेशान्वये कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर महिन्याला संचालक, नगर प्रशासन विभागास सादर करणे अपेक्षित आहे. मा. उच्च न्यायालयांचे आदेशान्वये नागपूर महानगरपालिका सिमेत कोणतेही अवैध आकाशचिन्ह/अवैध जाहिरात फलक, अवैध बॅनर्स असता कामा नये. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी होणेस्तव २४ X ७ तास नागपूर महानगरपालिका क्षेत्रात यंत्रणा कार्यरत असणे गरजेचे आहे. यंत्रणा २४ X ७ तास कार्यरत ठेवणेकरीता लागणारे मन्युष्य बळ, मशनिरी व अनुमती देणे/ अनुमती नाकारणे/ मौका चौकशी करणे इ. बाबी करीता लागणारा खर्च महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्हे (स्काय साईन) व आकाशचिन्ह प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ चे नियमक्र. २० च्या तरतुदन्वये परवाना शुल्क म्हणुन वसुल करणे अपेक्षित आहे.

आकाशचिन्ह परवाना विभाग, म.न.पा. ची यंत्रणा २४ X ७ तास कार्यरत ठेवणेकरीतालागणारा खर्चाचे विवरण धारीकेच्या उजव्या बाजुस जोडलेले आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन होणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २४४ व कलम २४५ च्या तरतुदी अंतर्गत कार्यवाही होणेस्तव २४ X ७ तास कार्यरत ठेवावयाचे यंत्रणेकरीता लागणा-या वार्षीक खर्चाचे प्रमाणात परवाना शुल्क आकारणेची दरसुची महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्हे (स्काय साईन) व आकाशचिन्ह प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ चे नियम क्र. २० च्या तरतुदी अन्वये असणे अभिप्रेत आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३८६ (२) च्या तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारातंर्गत परवाना शुल्क आकारणी करून नविन प्रस्तावित दर लागू करण्यास मंजुर प्राप्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

PROPOSED SCHEDULE RATE OF SKY-SIGN LICENCE FEE
w.e.f. FROM Dt. 01.04.2023

| Sr. No. | | Description | Scale of fees Per Month | Existing Rate (Per Sq m.) | New Rate (Per Sq m.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | a | Advertisement on hoarding or wall posts or in the form of non-illuminated sky - sign | For a space upto 1 Sqr. Mtr | 22.00 | 130.20 |
| | | | For every additional Sq. Mtr or less. | 22.00 | 130.20 |
| 2 | a | Advertisement boards carried on vehicle (Non illuminated) | For a space upto 2 Sqr. Mtr | 35.00 | 207.55 |
| | | | For every additional Sq. Mtr or less | 35.00 | 207.55 |
| 3 | a | Illuminated advertisement boards carried on vehicle | For a space upto 2 Sqr. Mtr | 62.50 | 370.62 |
| | | | For every additional 2 Sq. Mtr or less | 62.50 | 370.62 |
| 4 | a | For fixed illuminated sky – signs and advertisements | For a space upto 0.2 Sqr. Mtr | 12.50 | 74.00 |
| | | | For every additional 0.2 Sq. Mtr | 12.50 | 74.00 |
| 5 | a | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, neon | For a space upto 0.5 Sqr. Mtr | 88.00 | 415.00 |
| | | | For every additional 0.5 Sq. Mtr | 88.00 | 415.00 |

NOTE :-

1. If feeis not paid within the prescribed time, a composition amount equal to 10 percentof the license fee for delayup to 3 months and equal to 25 percent for delay of up to 6 months shall be payable. For delay beyond 6 months, the license shall be revoked.
2. Whoever commits a breach of provision of section 244 of MMC Act. and provision of any rule ofMaharashtraMunicipal Corporations (Regulation and Control of the Display of Sky-signs and Advertisement)Rules,2022, shall be punishable: With fine of Rs. 500/- for every day during which the breach continues after receipt of notice from the Municipal Commissioner to discontinue such breach.

संक्षिप्त टिपणीः-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २४४ च्या तरतुदीअन्वये नागपूर महानगरपालिका सिमेत कोणत्याही व्यक्तीने मा. आयुक्त, म.न.पा. महोदयाची अनुमती घेवूनच आकाशचिन्ह उभारणे/जाहिरात प्रदर्शित करणे अपेक्षित आहे.

कलम २४५ च्या तरतुदी अन्वये नियमाचे, अटीचे उल्लंघन केलेले आकाशचिन्हे/जाहिरात, अवैध आकाशचिन्हे/जाहिरात काढून टाकणेचे नागपूर महानगरपालिकेस अधिकार आहे. जनहीत याचिका क्र. ७४९/२००५ करीता मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ व जनहीत याचीका क्र. १५५/२०११ करीता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ द्वारा अनुक्रमे दि. ०४/०३/२०१०, ३१/०१/२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये नागपूर महानगापालिकेकरीता पुढील प्रमाणे निर्देश आहेत.

१. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेश/दिशा-निर्देशानुसार झोन स्तरावर अवैध जाहिरात फलक, अवैध बॅनर्स, अवैध स्टीकर्स, झाडावरील, ईलेक्ट्रीक खांबावरील अवैध बॅनर्स, स्टीकर्स इ. काढुन टाकणेची दैनदिन कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

२. त्या अनुषंगाने देखरेख/नियंत्रण ठेवण्यास्तव प्रत्येक झोन निहाय नोडल ऑफीसरची नेमणूक करणे, प्रत्येक झोन निहाय चमू तयार करून संबंधित पोलीस स्टेशन सोबत समन्वय साधुन काम करणे २४/७ तास कार्यवाही करणे, स्थानिक पोलीसांची समन्वय साधुन/मदत घेऊन संबंधीतावर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण अधिनियम १९९५ अंतर्गत कार्यवाही करून आकाशचिन्ह परवाना शुल्क, दंडवसुल करणे, अनधिकृत जाहिराती उभारण्यात आलेले घोषणा फलक, होर्डींग, पोस्टर्स इ. काढण्यापुर्वी त्याचे शुटींग किंवा छायाचीत्र काढुन पुरावा म्हणुन संबंधित पोलीस विभागास सादर करणे, त्याचप्रमाणे झोन स्तरावर टोल फ्री क्रमांकसह तक्रार कक्ष उघडण्यात यावे व टोल फ्री क्रमांक व नोडल ऑफीसर व चमूंचा भ्रमणध्वनी, संपर्क क्रमांकचा प्रचार व प्रसार वर्तमानपत्र, मनपा सांकेतीक स्थळावर आणि क्षेत्रीय कार्यालयाचे ठरावीक ठिकाणी प्रदर्शित करणे, प्राप्त झालेल्या तक्रारीचे निराकरण करण्यास्तव संबंधीतांना वळोवेळी कळविणे, अनधिकृत जाहिराती उभारणे हा दंडनिय गुन्हा असल्याबाबतचे फलक मौक्याचे ठीकाणी प्रदर्शित करणे, प्रत्येक प्रभाग नुसार नागरीकांची चमू तयार करुन अनधिकृतपणे उभारण्यात येणाऱ्या घोषणा फलक, होर्डींग, पोस्टर्स इ. वर देखरेख ठेवण्यास मदत घेणे, केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित झोनचे पोर्टलवर उपलब्ध करणे, प्रत्येक झोन निहाय केलेल्या कार्यवाहीची सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालाने यांनी दिलेल्या तक्त्यामध्ये नमुद करून पाठविणे, अभिकरणाव्दारे नागपूर शहरात विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या आकाशचिन्हांवर आकाशचिन्हांची परवाना संबंधी संपुर्ण माहिती QR Code मधे प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

३. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे अनुपालन होणेस्तव झोन स्तरावर दैनदिन कार्यवाही होणेस्तव म.न.पा. चा फार मोठया प्रमाणात अधिकारी/कर्मचारी तसेच पोलीस बळ आवश्यक आहे. तसेच साधन सामुग्री (मशनरी) व नैपुन्य (Skill) असलेले मनुष्यबळाची सहाय्यता घेणे अपेक्षीत आहे. तसेच अधिक प्रमाणात आकाशचिन्हे रात्रीच्या वेळेस अनधिकृतपणे उभारण्यात येत असल्यामुळे म.न.पा. अधिकारी/कर्मचारी आणि पोलीस बळ, साधन सामुग्रीसह चमुव्दारे रात्रीच्या वेळेस सुध्दा देखरेख/नियंत्रण ठेवणे अति आवश्यक आहे. जेणे करून मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन होईल.

तसेच जनहीत याचीका क्र. ७४९/२००५ करीता पारीत आदेशाचे पालन होत आहे किंवा नाही हयाबाबत जनहीत याचिकाकर्ते श्री दिनेश नायडू नजर ठेवून असतात व अवैध जाहिरात फलक, बॅनर, cut-outs व पताका चे छायाचित्र काढून मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ च्या समोर सादर करून नागपूर महानगरपालिका द्वारा आदेशाची अवमानना केलेची बाब मा. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करीत असतात. तसेच जनहीत याचिका क्र. १५५/२०११ करीता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ द्वारा महाराष्ट्रामधिल सर्व महानगरपालिका, नगरपालिका करीता अवैध जाहिरात फलक, बॅनर्स, cut-outs व पताका इत्यादी करीता करावयाचे कार्यवाही संबंधी जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशाची अंमलबजावणी होणे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्रैमासिक नगरपालिका प्रशासन, संचालनालय मुंबई येथे सादर करणे अभिप्रेत आहे.

उपरोक्त प्रमाणे नागपूर महानगरपालिका सिमेत २४ x ७ तास झोन स्तरावरील व मुख्यालयीन यंत्रणा कार्यरत असणे गरजेचे आहे. झोन स्तरावरील यंत्रणेकरीता व मुख्यालय स्तरावरील यंत्रणे करीता लागणारे मनुष्यबळ, यंत्रसामुग्री करीता लागणारे खर्च बाबत चे विस्तृत विवरण धारिकेच्या उजव्या बाजूस पृष्ठ क्र. १८४ मधिल तक्ता क्र. A, B, C, D अन्वये टाचन आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २४४ व २४५ च्या तरतुदी अंतर्गत महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्ह (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शन करणेचे नियमन आणि नियंत्रण] नियम २०२२ च्या तरतुदी अंतर्गत कार्यवाही करणेचे व जनहित याचिका क्र. ७४८/२००१ करीता मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे आदेश व जनहीत याचीका क्र. १५५/२०११ करीता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाचे आदेशाचे पालन होणे हेतू झोन स्तरावर व मुख्यालय स्तरावर २४ x ७ तास यंत्रणा कार्यरत करणे ठेवणे करीता वार्षिक खर्च रू. २३.७६ कोटी अपेक्षित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्ह (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शन करणेचे नियमन आणि नियंत्रण] नियम २०२२ चे नियम २० चे तरतुदी अन्वये मा. आयुक्त महोदयांनी नागपूर महानगरपालिकेच्या मंजूरीने परवाना शुल्क निश्चीत करणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्ह (स्कायसाईन)) व जाहिरात प्रदर्शन करणेचे नियमन आणि नियंत्रण] नियम २०२२ ची तरतुद अशी आहे की परवाना शुल्क निश्चीत करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे ३८६(२) अंतर्गत मा. आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजुरीने वेळोवेळी निश्चीत करतील असे परवाना शुल्क जारी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या वाजवी मर्यादेपेक्षा जास्त नसावे. जाहिरातीकरीता भाडे आकार, परवाना शुल्क हे अभिकरणांकडून महानगरपालिकेने वेळोवेळी मंजूर केलेल्या दरानुसार गोळा करण्यात यावे. सदरचे परवाना शुल्क आकारमधील वाढ दर ३ वर्षानंतर चलन वाढ दरानुसार निश्चीत करावी.

दि. ०५/१२/२०१२ पासून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नागपूर महानगरपालिका करीता लागू झालेला आहे. त्यापुर्वी नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ चे तरतुदी अंतर्गत नागपूर महानगरपालिकेचे कामकाज व कार्य पार पाडणे अपेक्षित होते. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ च्या तरतुदी मध्ये नागपूर महानगरपालिका सिमेतील आकाशचिन्ह (स्कायसाईन), जाहिरात फलक Outdoor media करीता अनुमती देणेबाबत स्पष्ट तरतुद नव्हती परंतु मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या आदेशान्वये नागपूर शहर आउटडोअर जाहिरात धोरण निश्चीत करण्यात आलेले होते. त्या धोरणाअंतर्गत नागपूर महानगरपालिका सिमेतील आकाशचिन्ह (स्कायसाईन), जाहिरात फलक व इतर आउटडोअर मिडीयावर नियमन व नियंत्रण ठेवण्यात येत होते. उक्त धोरणातील पान क्र. ४७ अन्वये मा. उच्च न्यायालयातील प्रकरण क्र. ४१७५/१९९९ अन्वये गठित समिती याच्या मान्यतेने २००१ मध्ये परवाना शुल्क निश्चीत करण्यात आले आहे. त्यास पुन्हा वर्ष २००९ मध्ये परवाना दर करीता म.न.पा. सभागृहांनी नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४८ चे कलम ३४८ (३) च्या तनतुदी अंतर्गत मंजुरी दिलेली होती. तदनंतर म.न.पा. सभागृहांनी ठराव क्र. ६३ दि. २०/०७/२०१७ अन्वये परवाना शुल्क पुढील प्रमाणे निश्चीत केलेला आहे. उक्त शुल्क नुसारच आजपर्यंत अभिकरणांकडून परवाना शुल्क वसूल करण्यात येत आहे.

| **Sr. No.** | | **Description** | Scale of fees Per Month | New Rate |
|---|---|---|---|---|
| **1** | **a** | Advertisements on hoarding or wall posts or in the form of non-illuminated sky - signs. | For a space up to 1 sq. mtr. | 22.00 |
| | | | For every additional sq. mtr. or less | 22.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **b** | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 22.00 |
| | **c** | Advertisements fixed or suspended in streets or on footpaths in connection with the charitable or educational object for a period not exceeding fifteen days. | Rates as shown in item 1 (a) | |
| **2** | **a** | Advertisement fixed or suspended in streets or footpaths | For a space up to 1 Sq. mtr | 19.00 |
| | | | For every additional sq. mtr or less. | 19.00 |
| | **b** | If the above advertisements project over or across streets. | For every mtr. | 33.00 |
| | **c** | Advertisement hoarding standing blank "but bearing the name of the advertiser or with the announcement to be let displayed there on. | 0.81 paisa per sq. mtr. Per month | Delit |
| **3** | **a** | Advertisement boards carried on vehicle | For a space up to 2 sq. mtr. | 44.00 |
| | | | For every additional sq. mtr or less. | 44.00 |
| | b | Loose poster which are posted or fixed on walls, roads or suspended in streets, etc. | 3.5 rupee per poster irrespective or the size but such posters must bear facsimile of an officer authorized by the corporation in this behalf. Posters without facsimile will be treated as unauthorized. But posters posted on hoardings or wall posters shall be charged at rate shown in item no. l(a) | |
| **4** | | Illuminated advertisement boards carried on vehicle. | For a space up to 2 sq. mtr. | 78.50 |
| | | | For every additional 2 sq. mtr. or less | 78.50 |
| **5** | | Advertisement boards carried by sandwich board men etc. | For each board not exceeding 1 sq.mtr. | 22.00 |
| | | | For every additional sq. mtr or less | 22.00 |
| **6** | | Illuminated advertisement boards, etc carried by sandwich board men. | For each board not exceeding 1 sq. mtr | 44.00 |
| | | | For every additional sq. mtr. or less. | 44.00 |
| **7** | a | For fixed illuminated sky-signs and advertisements. | For a space up to 0.2 sq.mtr. | 12.50 |
| | | | For every additional 0.2 sq. mtr. | 12.50 |
| | b | Advertisements on hoarding or wall posts illuminated by different means. | Rate shown in item 7 (a) above | |
| 8 | | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, neon, slides or similar devices. | For a space to 0.5 sq.mtr | 88.00 |
| | | | For every additional 0.5 sq.mtr. | 88.00 |

महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका व्दारा आकारण्यात येणारे परवाना शुल्काचे तुलनेत नागपूर महानगरपालिका व्दारा सध्या स्थितीत आकारण्यात येणारे शुल्क अत्यंल्प आहे. (शुल्काचा तक्ता धारीकेच्या उजव्या बाजुस संलग्न आहे)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नागपूर महानगरपालिकेत लागू झालेला असून उक्त अधिनियमात कलम २४४ अन्वये स्पष्ट तरतुद, अटी आहे की, कोणत्याही व्यक्तीने महानगरपालिका सिमेत मा. आयुक्तांची अनुमती शिवाय आकाशचिन्ह प्रदर्शित करू नये.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्ह (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शन करणेचे नियमन आणि नियंत्रण] नियम २०२२ च्या तरतुदी अंतर्गत नागपूर महानगरपालिका सिमेतील आकाशचिन्ह (स्कायसाईन), जाहिरात फलक, इतर आउटडोअर मिडीयावर नियमन व नियंत्रण आकाशचिन्ह परवाना विभाग, म.न.पा. द्वारा ठेवणे अपेक्षित आहे. तसेच तत्संबंधी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ व नागपूर खंडपीठ द्वारा अनुक्रमे जनहित याचिका क्र. १५५/२०१० व जनहीत याचीका क्र. ७४९/२००१ करीता पारित आदेशान्वये अवैध आकाशचिन्ह, जाहिरात फलक, बॅनर्स पताका व इतर आउटडोअर मिडीया मधील प्रदर्शित

होणाऱ्या अवैध आकाशचिन्हावर नियमीत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्याकरीता नागपूर महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागात अंदाजे वार्षिक रू. २३.७६ कोटी अपेक्षित आहे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३८६(२) ची तरतुद व महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्ह (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शन करणेचे नियमन आणि नियंत्रण] नियम २०२२ चे नियम २० चे तरतुदी अंतर्गत मा. आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजूरीने वेळोवेळी निश्चीत करतील असे परवाना शुल्क जारी करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या वाजवी मर्यादेपेक्षा जास्त नसावे व सदर खर्चा इतके परवाना शुल्क वसूल होणेकरीता खालीलप्रमाणे नविन परवाना शुल्क निश्चीत करणेचे प्रस्तूत आहे.

| Sr. No. | | Description | Scale of fees Per Month | Existing Rate (Per Sq m.) | New Rate (Per Sq m.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | a | Advertisement on hoarding or wall posts or in the form of non-illuminated sky - sign | For a space upto 1 Sqr. Mtr | 22.00 | 130.20 |
| | | | For every additional Sq. Mtr or less. | 22.00 | 130.20 |
| 2 | a | Advertisement boards carried on vehicle (Non illuminated) | For a space upto 2 Sqr. Mtr | 35.00 | 207.55 |
| | | | For every additional Sq. Mtr or less | 35.00 | 207.55 |
| 3 | a | Illuminated advertisement boards carried on vehicle | For a space upto 2 Sqr. Mtr | 62.50 | 370.62 |
| | | | For every additional 2 Sq. Mtr or less | 62.50 | 370.62 |
| 4 | a | For fixed illuminated sky – signs and advertisements | For a space upto 0.2 Sqr. Mtr | 12.50 | 74.00 |
| | | | For every additional 0.2 Sq. Mtr | 12.50 | 74.00 |
| 5 | a | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, neon | For a space upto 0.5 Sqr. Mtr | 88.00 | 415.00 |
| | | | For every additional 0.5 Sq. Mtr | 88.00 | 415.00 |

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 258/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 14/02/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, महसूल विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील आकाशचिन्हे उभारणे व जाहिरात प्रदर्शित करणेबाबत नियमन व नियंत्रण ठेवणे तसेच अवैध आकाशचिन्ह, अवैध जाहिरात फलक इ. करीता नियमीत कार्यवाही करणे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ व नागपूर खंडपीठ व्दारा न्यायालयीन प्रकरण क्र. १५५/२०११ व क्र. २६६/२०१० व २५६/२०१० पारीत केलेल्या आदेशान्वये कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर महिन्याला संचालक, नगर प्रशासन विभागास सादर करणे अपेक्षित आहे. मा. उच्च न्यायालयांचे आदेशान्वये नागपूर महानगरपालिका सिमेत कोणतेही अवैध आकाशचिन्ह/अवैध जाहिरात फलक, अवैध बॅनर्स असता कामा नये. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी होणेस्तव २४ X ७ तास नागपूर महानगरपालिका क्षेत्रात यंत्रणा कार्यरत असणे गरजेचे आहे. यंत्रणा २४ X ७ तास कार्यरत ठेवणेकरीता लागणारे मन्युष्य बळ, मशनिरी व अनुमती देणे/ अनुमती नाकारणे/ मौका चौकशी करणे इ. बाबी करीता लागणारा खर्च महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्हे (स्काय साईन) व आकाशचिन्ह प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ चे नियम क्र. २० च्या तरतुदन्वये परवाना शुल्क म्हणुन वसुल करणे अपेक्षित आहे.

आकाशचिन्ह परवाना विभाग, म.न.पा. ची यंत्रणा २४ X ७ तास कार्यरत ठेवणेकरीतालागणारा खर्चाचे विवरण धारीकेच्या उजव्या बाजुस जोडलेले आहे. मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन होणे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २४४ व कलम २४५ च्या तरतुदी अंतर्गत कार्यवाही होणेस्तव २४ X ७ तास कार्यरत ठेवावयाचे यंत्रणेकरीता लागणा-या वार्षीक खर्चाचे प्रमाणात परवाना शुल्क आकारणेची दरसुची महाराष्ट्र महानगरपालिका [आकाशचिन्हे (स्काय साईन) व आकाशचिन्ह प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण] नियम, २०२२ चे नियम क्र. २० च्या तरतुदी अन्वये असणे अभिप्रेत आहे.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३८६ (२) च्या तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारातंर्गत परवाना शुल्क आकारणी करून नविन प्रस्तावित दर लागू करण्यास मंजुरी प्राप्त करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

PROPOSED SCHEDULE RATE OF SKY-SIGN LICENCE FEE
w.e.f. FROM Dt. 01.04.2023

| Sr. No. | | Description | Scale of fees Per Month | Existing Rate (Per Sq m.) | New Rate (Per Sq m.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | a | Advertisement on hoarding or wall posts or in the form of non-illuminated sky - sign | For a space upto 1 Sqr. Mtr | 22.00 | 130.20 |
| | | | For every additional Sq. Mtr or less. | 22.00 | 130.20 |
| 2 | a | Advertisement boards carried on vehicle (Non illuminated) | For a space upto 2 Sqr. Mtr | 35.00 | 207.55 |
| | | | For every additional Sq. Mtr or less | 35.00 | 207.55 |
| 3 | a | Illuminated advertisement boards carried on vehicle | For a space upto 2 Sqr. Mtr | 62.50 | 370.62 |
| | | | For every additional 2 Sq. Mtr or less | 62.50 | 370.62 |
| 4 | a | For fixed illuminated sky – signs and advertisements | For a space upto 0.2 Sqr. Mtr | 12.50 | 74.00 |
| | | | For every additional 0.2 Sq. Mtr | 12.50 | 74.00 |
| 5 | a | For illuminated sky - signs and advertisements exhibited on screens by means of lantern, neon | For a space upto 0.5 Sqr. Mtr | 88.00 | 415.00 |
| | | | For every additional 0.5 Sq. Mtr | 88.00 | 415.00 |

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**